# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com


क्रमांक :-सी/कार्या-३डी/एल-३७७
दिनांक :- १२/४/२००६.

प्रति,
झरनी पटेल थॉमस.
अपार्टमेंट नं. ७.
अ नेमच्युन अपार्टमेंट.
जुहूतारा रोड. मुंबई-४०० ०४९

**विषय :- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा**
**मौजे जुहू ता. अंधेरी स.नं. ७३पै १०५.१८ चौ.वार क्षेत्रावरील श्रीमती रुबी पटेल यांचे अतिक्रमण नियमानुकूल केलेली जागा श्री. खेमराज अग्रवाल व श्रीमती दिपा अग्रवाल यांना हस्तांतरणास परवानगी मिळणेबाबत.**

**संदर्भ :- आपले पत्र दि.३१/३/२००६**

महोदय,

मौजे जुहू ता. अंधेरी स.नं. ७३पै क्षेत्र १०५.१८ चौ.वार (८८.२८ चौ.मी.) जमिनीवरील श्रीमती रुबी पटेल यांचे अतिक्रमण, महाराष्ट्र जमिन महसूल(सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम -४३(ब) अनुसार मा. मंत्री (महसूल) यांचेकडील निर्णय क्र. जमिन २६९८/५१८/प्र.क्र. ७७०२/ज-३ दि.१७/१०/२००२ व इकडील आदेश क्र. १७/३डी/एल-३७७ दि.१५/१०/२००३ अन्वये आदेशाच्या दिनांकापासून ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने नियमानूकूल केले आहे.

आता श्रीमती झरणी पटेल थॉमस यांनी त्यांचे पत्र दि.३१/३/२००६ अन्वये सदरची प्रश्नाधीन जागा श्री. खेमराज आर. अग्रवाल व श्रीमती दिपा अग्रवाल यांना हस्तांतर करण्यास परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

श्रीमती रुबी पटेल मूळ अतिक्रमणदार/भाडेपट्टेदार ह्या मयत झाल्या असून त्यांचे इतर वारसांनी श्रीमती झरनी पटेल थॉमस यांना जाहिरनाम्याद्वारे सदर जागेसंबंधीचे सर्व हक्क प्रदान केले आहेत.

श्रीमती झरनी पटेल थॉमस पटेल यांचे संदर्भाधीन पत्रातील विनंतीचे अनुषंगाने, मौजे जुहू ता. अंधेरी स.नं. ७३ पैकी १०५.५८ चौ.वार (८८.२८ चौ.मी.) क्षेत्र शासन निर्णय दि.२१/११/५७ नुसार अनर्जित उत्पन्न



Scanned by CamScanner

भरणाच्या अटीवर व खालील अटी/शर्तीवर श्री. खेमराज आर. अग्रवाल व श्रीमती दिपा अग्रवाल यांचे नांवे हस्तांतर करण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

**अटी/शर्ती**

१) अर्जदार यांनी शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय दि.२१/११/१९५७ नुसार तात्पुरती ५०% अनर्जित उत्पन्नाची रक्कम रु. १४,००,०००/- (रु. चौदा लाख मात्र) या कार्यालयात ७ दिवसात जमा करावी.

२) नवीन भाडेपट्टेदार यांनी आदेश समक्रमांक दि.१५/१०/२००३ अन्वये आकारलेली वार्षिक भाडेपट्ट्याची रक्कम आगाऊ नियमित भरणा करावी.

३) शासन/जिल्हाधिकारी यांनी श्रीमती रुबी पटेल यांचे अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या जागेच्या संदर्भातील इकडील आदेश समक्रमांक दि.१५/१०/२००३ मधील अटी शर्ती नवीन भाडेपट्टेदारास बंधनकारक राहतील.

४) सदर जागेची शासनास आवश्यकता भासल्यास कोणतीही नुकसान भरपाई न देता प्रस्तुत जागेचा/भूखंडाचा ताबा विना शर्त शासनास सुपूर्द करणे बंधनकारक राहील.

५) प्रश्नाधीन जागेच्या संदर्भात खरेदीदार व विक्रिदार यांचेमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद असल्यास/झाल्यास, त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, किंवा नुकसान भरपाई सुध्दा मिळणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.

६) श्रीमती झरनी पटेल थॉमस यांनी सादर केलेल्या जाहिरनाम्यातील वारसांव्यतिरिक्त श्रीमती रुबी पटेल यांचे इतर कोणी वारस म्हणून प्रश्नाधीन जागेवर दावा केल्यास, त्यामुळे उद्‌भवणाऱ्या वादास सर्वस्वी जबाबदार आपली राहील.

७) नविन भाडेपट्टेदारास सदरची जागा विक्री/हस्तांतरण/गहाण/पोट भाडेकरु ठेवावयाचा असल्यास या कार्यालयाची रितसर परवानगी घ्यावी लागेल. अन्यथा शासन नियमानुसार अनर्जित उत्पन्न अदा करावे लागेल.

८) अनर्जित उत्पन्नाच्या रक्कमेची आकारणी करताना तात्पुरत्या दराने आकारणी करणेंत आली असून प्रकरणी सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग यांचेकडून जमिनीचे अंतिम मुल्यांकन प्राप्त झाल्यास, त्याप्रमाणे येणारी फरकाची अनर्जित उत्पन्नाची रक्कम भरणा करणेस बंधनकारक राहील.

९) अनर्जित उत्पन्नाची रक्कम गणना करतांना चुक झालेचे निदर्शनास आल्यास, चुक दुरुस्तीनंतर जास्त होणारी रक्कम शासनास भरावी लागेल.


Scanned by CamScanner

१०) प्रश्नाधीन जागेचा विकास, वापरात बदल व अन्य प्रयोजनार्थ वापर करण्यापूर्वी या कार्यालयाची पूर्व परवानगी घेणे नविन भाडेपट्टेदारास बंधनकारक राहिल.

११) विक्रीदार व खरेदीदार यांचेमध्ये होणाऱ्या करारनाम्याची प्रत नवीन भाडेपट्टेदाराने या कार्यालयास सादर करावी.

१२) भविष्यात शासनाने भाडेपट्टयाबाबतचे नविन धोरण जाहिर केल्यास, नविन भाडेपट्टेदारास त्याप्रमाणे वार्षिक भुईभाड्याची रक्कम भरणे बंधनकारक राहील.

१३) वरील अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे रु. १००/- च्या मुद्रांकीत पेपरवर टंकलिखित करुन हमीपत्र नव्याने येणाऱ्या भाडेपट्टेदाराने ७ दिवसात या कार्यालयास सादर करावे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

Scanned by CamScanner